# 'प्रकाश इन्स्टिट्यूट' बरोबर दक्षिण अफ्रिकेचे स्वास्थ्य मंत्रालय करणार सामंजस्य करार

इस्लामपूर, दि. ८ (प्रतिनिधी) - येथील प्रकाश इन्स्टिटयुट मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च व दक्षिण आफ्रिकेच्या शिक्षण व स्वास्थ्य मंत्रालयामध्ये भविष्यात वैद्यकीय शिक्षण व आरोग्य सेवेबाबत सामंजस्य करार करण्याबाबतचा विश्वास दक्षिण आफ्रिकेच्या शिक्षण मंत्रालयाच्या सचिव डॉ. मेक सेलाबी यांनी व्यक्त केला.

दरम्यान, भारतातील निवडक वैद्यकीय महाविद्यालय व आरोग्य सेवेत असणाऱ्या हॉस्पिटलची पाहणी करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या मंत्रालयातील शिक्षण व स्वास्थ्य विभागाची समितीने भेट



इस्लामपूर : दक्षिण आफ्रिकेचे वैद्यकीय शिक्षण डॉ. मेक सेलाबी, ॲडम मोलापो, सॅन्टी मोफोका, डॉ. इ. एन. तलाले, उद्योगपती सलोमोन लिथोबा यांच्या समितीने दिलेली भेट.

दिली. समितीमध्ये दक्षिण आफ्रिकेचे ॲडम मोलापो, प्रधानविधी अधिकारी, सॅन्टी मोफोका, डॉ. इ. एन. तलाले, उद्योगपती सलोमोन लिथोबा या अधिकाऱ्यांचा समावेश होता. यावेळी उरूण इस्लामपूरचे नगराध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील उपस्थित होते.

हॉस्पिटलमधील सोयी सुविधा, रूग्णास मिळणारी सेवा, अत्याधुनिक विभाग, तज्ञ डॉक्टर, याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. इस्लामपूर सारख्या निमः शहरात असे दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटल आदर्शपणे चालविले आहे. भविष्यात वैद्यकीय शिक्षण व आरोग्य सेवेबाबत प्रकाश शिक्षण मंडळ संचलित प्रकाश इन्स्टिटयुट मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च व दक्षिण आफ्रिकेच्या शिक्षण व स्वास्थ्य मंत्रालयामध्ये सामंजस्य करार करणेबाबत निश्चित विचार केला जाईल, असे डॉ. मेक सेलाबी यांनी सांगितले. यावेळी प्रकाश इन्स्टिटयुट मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटरचे मेडिकल डायरेक्टर डॉ. विजय पाटील, आधिष्ठता डॉ. वृषाली वाटवे, डॉ. प्रदिप कुलकर्णी, अक्षय पाटील, डॉ. अभिमन्यु पाटील, अभिजीत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.